# ७. गवताचे पाते

– वि. स. खांडेकर

**शब्दार्थ –**

१) अरसिक – रुचिहीन वृत्ती.

२) कर्णकटू – कानांना त्रासदायक असा.

३) चिमणे – लहान.

४) गिरक्या – गोल फिरणे.

५) चुराडा – चक्काचूर.

६) पुनरावृत्ती – एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करणे.

७) समरस – एकजीव.

८) संजीवक – चैतन्यमय.

९) क्षुद्र – तुच्छ.

१०) दंगा – गोंधळ.

११) बिब्बा – ही एक खूप उष्ण गुणधर्म असलेली वनस्पती आहे. ज्या व्यक्तीला चटकन राग येतो. त्या व्यक्तीला चिडखोर बिब्बा असे म्हटले जाते.

**वाक्प्रचार व त्यांचे अर्थ :**

१) कित्ता गिरवणे – एखाद्याने केलेली कृती पुन्हा पुन्हा करणे.

२) कपाळाला आठ्या पडणे – वैतागणे.

३) जीव खाणे – त्रास देणे.

४) तोंडसुख घेणे – रागावून वाटेल तसे बोलणे.

५) स्वप्नांचा चुराडा होणे – स्वप्न पूर्ण न होणे, नष्ट होणे.